# 2 तीमथ्याला

2 Timothy

# 2 तीमथ्याला

*पौलाचे तीमथ्याला दुसरे पत्र*

## 1

1 पौलांकडून जो जीवनाच्या त्या प्रतिज्ञेनुसार, जी येशू ख्रिस्तांठायी आहे, परमेश्वराच्या इच्छेने येशूंचा प्रेषित
(पाठविलेला) झाला आहे.
2 माझ्या लाडक्या मुला तीमथ्या, तुला परमेश्वर पिता आणि येशू ख्रिस्तांपासून अनुग्रह-दया आणि शांति मिळो.
3 माझ्या पूर्वजांनी ज्या परमेश्वराची सेवा केली, त्याची सेवा मीही शुद्ध विवेकाने करतो, आपल्या त्याच परमेश्वराचे मी
आभार मानतो. मी रात्रंदिवस आपल्या प्रार्थनांत तुला निरंतर स्मरतो. 4 तुझे अश्रु आठवल्यावर, (त्यांचे स्मरण होताच)
तुला पाहून (भेटून) मी आनंदाने भरून जावे की काय, अशी माझ्या मनात मोठी लालसा होत असते. 5 या गोष्टीविषयी मी
अगदी निश्चिंत (खात्री) आहे की, जो विश्वास पहिल्याने तुझी आजी लोईस आणि आई युनीके, या दोघींठायी होता, तोच
सत्य विश्वास तुझ्याठायीही आहे. 6 माझे हात तुझ्यावर ठेवले गेल्यावर तुला जे कृपादान मिळाले होते, त्याची आठवण
पुन्हा करून देण्याची माझी इच्छा आहे, की त्या कृपादानाला तू अधिक चमक द्यावी, याची नितांत आवश्यकता आहे.
7 कारण परमेश्वराने आपल्याठायी भयाचा (भीत राहण्याचा) नव्हे तर शक्ति (सामर्थ्य), प्रेम आणि संयमनाचा (शीतल
मस्तिष्क) आत्मा दिलेला आहे.
8 पहा तीमथ्या, येशूंच्या आणि मी जो त्यांचा कैदी आहे, अशा आम्ही दोघांच्या साक्षीची तू लाज धरू नको, परंतु
परमेश्वराच्या सामर्थ्याने येशू-वार्ता गाजविल्यामुळे जे कष्ट येत आहेत, ते माझ्याबरोबर सहन कर. 9 त्यांनी (येशूंनी)
आपल्याला उद्धार दिला आणि पवित्र पाचारणाने (बोलाविले) आपल्याला विशेष कामगिरी करण्यासाठी बोलावलेले
आहे. हे पाचारण त्यांच्या स्वतःच्या हेतू आणि अनुग्रहामुळे (अटहीन कृपा) सृष्टीच्या निर्मितीपूर्वी आपल्याला येशूंठायी
मिळाले होते आणि आपल्या सत्कृत्यांमुळे (भलेपणाची कृत्येंची कार्ये) आपण ती स्वतः मिळविलेली नव्हती. 10 ज्या
येशू ख्रिस्तांनी येशू-वार्तेद्वारे मृत्यूचा विनाश केला व जीवन आणि अमरत्व आपल्यापुढे सादर केले, त्याच उद्धारकर्ता
येशू ख्रिस्तांच्या पृथ्वीवरील प्रगटीकरणाने, हे (उद्धार आणि पवित्र पाचारण) आता आपल्यासमोर ठेवलेले (सादर)
आहे. 11 गैरयहूदी लोकांना हीच येशू-वार्ता देण्यासाठी मी एक संदेशवाहक, प्रेषित आणि शिक्षक असा नेमला (ठरलेला)
गेलो आहे. 12 याच कारणास्तव मी ही दुःखे भोगतो आहे, तरीही त्याची मला लाज वाटत नाही, कारण मला खात्रीने
ठाऊक आहे आणि मी निश्चिंत आहे की मी ज्यांच्यावर भरंवसा ठेवला आहे आणि जे काही त्यांना सुपूर्द करून
टाकलेले आहे, ते त्याला राखून ठेवण्याजोगे आहेत.
13 ख्रिस्त येशूंठायी, विश्वास व प्रेमासह, जे सत्य व जी योग्य शिकवण तू माझ्यापासून ऐकली होती, ती मजबूतीने
धरून रहा. 14 जी उत्तम वस्तु तुला सोपविली गेली होती, आपल्या आत वास करणाऱ्या पवित्र आत्म्याच्याद्वारे, ती
व्यवस्थित सांभाळून ठेव.
15 तुला तर ठाऊकच आहे की आशियातील सर्व म्हणजे फुगल आणि हर्मगनेसाने सुद्धा आम्हांला सोडले होते;
16 अनेसिफराच्या कुटुंबावर येशूंनी कृपा करावी, कारण अनेकदा त्याने (मला धीर देऊन) माझी हिंमत वाढवली
आणि इतकेच केवळ नव्हे तर, त्याला मी कैदी असल्याची लाजही वाटली नाही. 17 जेव्हा तो रोम शहरात आला, तेव्हा
मला शोधण्यासाठी त्याने भरपूर श्रम घेतले आणि शेवटी मी त्याला सापडलोच. 18 प्रभू करो आणि त्या दिवशी तो
परमेश्वराची दया प्राप्त करो. तुला चांगले माहीत आहे की इफिसांत त्याने अनेक प्रकारे माझी सेवा केली होती.

## 2

1 म्हणून हे माझ्या मुला, ख्रिस्त येशूंठायी जो अनुग्रह (अटहीन कृपा) आहे, त्यात बलवान (सशक्त) होत चल.

2 अनेक साक्षीदारांच्या उपस्थितीत, तू जे काही माझ्यापासून ऐकले होते त्याच गोष्टी, अशा विश्वासयोग्य लोकांच्या
हवाली कर (सोपून दे), जे लोक दुसऱ्यांना त्याच गोष्टी ऐकवण्यास (शिकविण्यास) योग्य आहेत. 3 येशू ख्रिस्तांच्या
''सर्वांगाने योग्य असलेल्या सैनिकासारखा,'' माझ्यासह दुःख (अडचणी) सहन करीत रहा; 4 एक माणूस सेनेत भरती
झाल्यानंतर त्याने एखाद्या सर्वसामान्य (आम) माणसासारखे (नागरिक) जीवन जगण्याची इच्छा बाळगणे हे कधीही
शक्य नाही, किंबहुना ती अशक्य कोटीतील बाब ठरील! असे जर झाले तर, ज्याने त्याला सेनेत भरती करून घेतले,
त्याला तो आनंदित करू शकणार नाही. 5 तसेच जर एखाद्याने खेळ स्पर्धेच्या नियमांचे पालन केले नाही (नसेल) तर
भाग घेतल्यानंतरही तो पुरस्कार मिळवू शकण्यायोग्य नसतो. 6 श्रम करणारा शेतकरी, याविषयीचा अधिकार बाळगतो,
की त्याने पीकाचा पहिला वाटा घ्यावा. 7 जे मी तुला सांगतो आहे, त्याकडे बारीक लक्ष दे. प्रभू येशूंनी तुला सर्व गोष्टींची
समज द्यावी.
8 होय, हे स्मरणी असू दे की, माझ्या येशूवार्तेनुसार, दावीदाच्या वंशातील येशू ख्रिस्त मेलेल्यांतून जिवंत उठविले गेले.
9 हेच सत्य, इतरांपर्यंत (सर्वांना) पोहचविल्यामुळे, मी एखाद्या अपराध्यासारखा दुःख सोशीत आहे, इतकेच काय, मी
तर बेड्यांनी जखडलेलो (अडकवून) आहे, परंतु परमेश्वराचे वचन साखळदंडांनी जखडलेले (बांधलेले) नाहीये.
10 परमेश्वराने ज्या लोकांना आपल्यासाठी निवडले आहे, त्यांनी ''दुसरा'' अर्थात तो उद्धारही मिळवून घ्यावा जो अनंत
महिमेसह ख्रिस्त येशूंठायी आहे, याच कारणास्तव मी सर्व काही तक्रार न करता सहन करतो (टिकून) आहे,
11 हे अगदी सत्य आहे की, जर आपण त्यांच्याबरोबर मरून चुकलो आहोत तर त्यांच्याबरोबर जिवंतही राहू.
12 जर आपण धीराने टिकून, सहन करीत राहिलो तर, त्यांच्याबरोबर शासनही करू; जर आपण त्यांना नाकारिले तर,
तेही आपल्याला नाकारतील. 13 आपण जरी विश्वासात एकनिष्ठ राहिलो नाही तरी, ते सतत निष्ठावान (भरंवसा ठेविता
यावा) आहेत, कारण ते आपल्या स्वतःला (विश्वसनियतेला) नाकारू शकत नाहीत.
14 या सर्व गोष्टींचे तू त्यांना स्मरण करून दे आणि गांभिर्याने म्हणजे प्रभू येशूंच्या उपस्थितीत याविषयीची घोषणा कर
की, त्यांनी शब्दांवरुन एकमेकांशी भांडण करू नये; कारण शब्द युद्ध केल्याने कोणताच फायदा होत नसतो, शिवाय
असे होते की त्यामुळे ऐकणाऱ्यांचा नाश होतो. 15 जसे परमेश्वराला मान्य आहे, तसे स्वतःला परमेश्वरासमोर सादर करीत
रहावे म्हणून, त्या प्रकारचा प्रत्येक (मनाच्या उभारीने, जोमासह) प्रयत्न करीत रहा आणि एक असा कामकरी हो, जो
सत्य वचनाचा अगदी न्याय्य (बरोबर) उपयोग करून त्याविषयीची लाज (अजिबात) बाळगत नसतो. 16 व्यर्थ धर्मनिंदा
आणि रिकाम्या वटवटीपासून स्वतःला राखून ठेव कारण त्यामुळे लोक अधिक भ्रष्ट होत जातील. 17 त्यांची शिकवण
कॅंसर सारखी पसरत जाईल; त्यांच्यापैकीच हुमनाय व फिलेत हे देखील आहेत. 18 मेलेले जिवंत उठलेही आहेत
(पुनरूत्थान होऊन चुकले आहे), असे बोलून (सांगून) ते सत्यापासून बरेच दूर झाले आहेत; इतकेच नसून ते लोकांचा
विश्वास डळमळीत (स्थिर नसणे) करीत आहेत. 19 ते सत्यापासून लांब गेले तरी काहीही का असेना, परमेश्वराचा
शिक्का या पायावर टिकून स्थिर रहातो की, परमेश्वर आपले स्वतःचे (त्यांचेच) लोक ओळखतो आणि जो कोणी ख्रिस्त
येशूंचे बोट घेतो, त्याने दुष्टाईपासून दूर रहावे''.
20 एखाद्या मोठ्या घरात फक्त सोन्या-चांदीची भांडीच (पात्रे) नसतात, पण लाकूड व मातीचीही असतातच. काही
विशिष्ट उपयोगाची आणि काही सामान्य उपयोगाची असतात. 21 म्हणून जो मनुष्य आपल्या स्वतःला वर
सांगितल्याप्रमाणे अनादराचे पात्र न होऊ देता शुद्ध करील, तो आपल्या स्वामीसाठी शुद्ध उपयोगी आणि एकूणएक उत्तम
कार्यासाठी, तयार असलेले आदराचे पात्र (भांडे) होईल.
22 आपल्या तरूणपणाच्या हव्या असलेला तीव्र इच्छांवर लगाम (ताबा ठेव) लाव आणि जे लोक शुद्ध हृदयाने येशू
प्रभूची प्रार्थना करतात (हाक मारितात), त्यांच्याशी मिळून (त्यांच्याबरोबर) त्यांच्यासह, प्रामाणिकपणा, विश्वास, प्रेम
आणि शांति यांची आस बाळगून त्यांच्या पाठीस लागलेला ऐस. 23 या गोष्टीची जाणीव असू दे की मूर्खपणा आणि
अज्ञानी (वेडगळपणाची) बकबक केल्याने भांडणे उद्‌भवतात (उत्पन्न होतात) म्हणून या वाद-प्रतिवादापासून स्वतःचे
रक्षण करीत रहा. 24 ख्रिस्त-सेवकाने भांडखोर असण्याऐवजी, शिकविण्याजोगे व सौम्य (धीर बाळगणारा) असावयास
हवे. 25 कदाचित परमेश्वर त्यांना मन परिवर्तनाची संधी देईल . त्यांना सत्याविषयीची पूर्ण ओळख होईल अशा हेतूने

नेहमी आपल्या विरोधकांना नम्रतेने शिक्षण देत रहा; 26 असे होऊ शकते की आता या समयी, सैतानाची इच्छा पूर्ण
करण्यासाठी ते त्याच्या जाळ्यात फसलेले (अडकलेले) आहेत, परंतु कोणास ठाऊक की शुद्धीवर येऊन ते सैतानाच्या
बंधनातून सुटतील, ज्याने त्यांना कैद करून ठेवलेले आहे.

## 3

1 हे देखील लक्षात ठेव (जाणीव असू दे) की, शेवटल्या काळी, भीषण धोकादायक व आपत्तिचे दिवस येतील.
2 लोक स्वतःवरच प्रेम करणारे आणि धनलोभी होतील. ते स्वतःची बढाई मारणारे असे ‘फुगणारे-गर्विष्ठ’ होतील, ते
परमेश्वराविरूद्ध बोलणारे (अर्थात ईश-निंदा करणारे) होतील. आईबापांच्या गोष्टी टाळणारे, धन्यवाद (आभार) न देणारे
आणि अशुद्ध, 3 स्वाभाविक प्रेम नसलेले, क्षमा न करणारे, निंदा करणारे, असंयमी, निर्दयी व चांगुलपणाचे विरोधक
होतील. 4 विश्वासघातकी, हट्टी, गर्वाने भरलेले आणि परमेश्वरावर प्रेम (ची आवड) करण्याऐवजी, सुखविलासाचे शोधक
होतील. 5 नीतिमान भासतील, पण नीतिमत्वाचे सामर्थ्य नाकारणारे (अमान्य करणारे) होतील. अशा लोकांपासून दूर
रहा.
6 अशा प्रकारचेच काही लोक चलाखीने त्या मूर्ख स्त्रियांच्या घरात शिरतात, त्या स्त्रियांना वश (आपल्या नियंत्रणात)
करतात; या स्त्रिया अनेक प्रकारच्या दुष्टाईने खच्चून भरलेल्या असतात आणि लालसांच्या वश (आधीन) झालेल्या
असतात. 7 त्या सतत काही-काही नवीन शिकत असतात, पण तरीही त्यांना सत्य कधीच ओळखता येत नाही. 8 जसे
यान्नेस व यांब्रेस यांनी मोशेचा विरोध केला होता, तसेच हे अनैतिक-भ्रष्ट अंतःकरणाचे लोक, सत्याचा विरोध करतात
आणि जर विश्वासाचा प्रश्न आहे तर, ते कुचकामाचे (बेकार) ठरतात. 9 अशा लोकांना कोणतेही यश संपादन करता
येणार नाही, उलट ज्या प्रकारे मोशेच्या विरोधकांचा मूर्खपणा सर्वांसमोर उघड झाला, तसे त्यांचेही होईल.
10 परंतु तू माझे शिक्षण, लक्ष्य, विश्वास, धीर, प्रेम आणि सहनशीलता ही सर्व पाहिलेली आहेत. 11 अंत्युखियात,
इकुन्यांत व लुस्त्रा येथे मला कोणकोणत्या छळांचा व संकटांचा सामना करावा लागला, मी काय काय सोसले नाही, ते
तुला ठाऊकच आहे! परंतु येशूंनी मला त्या सर्वांतून सोडविले. 12 जे लोक येशू ख्रिस्तांखातर खरे व सात्विक जीवन
जगण्याची इच्छा बाळगतात, त्यां सर्वांचा छळ केला जाईल. 13 या उलट, दुष्ट व धोकेबाज लोक वाईट आहेतच पण ते
अधिकाधिक दुष्ट होत जातील, ते स्वतः फसतील (धोका होईल) आणि दुसऱ्यांनाही त्या खड्डयात ढकलतील. 14 परंतु
या गोष्टीची जाणीव असू दे, की तू ते कोणाद्वारे शिकलास. जे तू माझ्यापासून शिकलास आणि त्यावर विश्वासही केलास,
त्या सर्व गोष्टी तूला करीतच रहावयाच्या आहेत. 15 बालपणापासूनच तुला वचनें (पवित्र बायबल) माहीत आहेत.
16 संपूर्ण बायबल परमेश्वराच्या आत्म्याच्या प्रेरणेने रचलेले आहे; ते तुला ख्रिस्त येशूंवर विश्वास ठेवून उद्धार प्राप्त
करण्याकरता ज्ञानी करते. बायबल, शिकविण्यासाठी, बोध व मन वळविण्यासाठी, चुका सुधारण्यासाठी आणि योग्य
व न्याय्य कार्य करण्याची दिशा दाखविण्यासाठी (योग्य) आहे, 17 जेणेकरून परमेश्वराच्या भक्ताने स्वतः मजबूत व्हावे
आणि प्रत्येक चांगले कार्य करण्याच्या लायकीचा होऊन सज्ज (तयार) व्हावे.

## 4

1 परमेश्वर आणि येशू ख्रिस्त जे दुसऱ्यांदा येऊन मेलेल्यांचा व जिवंताचा न्याय करणार आहेत आणि राज्य करणार
आहेत, त्यांच्या उपस्थितीत मी तुला असा आदेश देतो की, 2 परमेश्वराची येशू-वार्ता (वचन) गाजीव, वेळी -अवेळी
तयार रहा. खात्री पटवून दे, लोकांवर राग प्रगट कर (सुवेळी), धीराने शिकवीत रहा आणि त्यांची मने वळवण्याचा
प्रयत्न कर. 3 एक समय येणार आहे जेव्हा लोक योग्य शिक्षण सहन करू शकणार नाहीत, या ऐवजी आपल्या
आवडीच्या गोष्टी ऐकण्यासाठी आणि त्यांच्यापासून समाधान मिळवून घेण्यासाठी ते ढीगभर शिक्षकांना गोळा करतील.
4 आपले कान सत्यापासून बाजूला सारून, ते आपले लक्ष रिकाम्या कहाण्यांकडे केंद्रित करतील. 5 तू सर्व बाबतींत
सतर्क (सावध) ऐस; दुःखांना सामोरे जाऊन ती सहन कर, दुसऱ्यांपर्यंत येशू-वार्ता पोहचविण्याचे कार्य करीत रहा आणि
आपली सेवा पूर्ण कर.

6 मी ओतल्या जाणाऱ्यां अर्पणासारखा आहे आणि या पृथ्वीवरून माझा जाण्याचा समय आलेलाच आहे. 7 मी स्पर्धेत
(मल्लयुद्ध) संपूर्ण तनाने व मनाने भाग घेतलेला आहे. मी आपली धाव संपवीली आहे आणि विश्वासाचे रक्षण केले आहे.
8 नीतिमत्वाचा तो मुकूट माझ्यासाठी आणि त्या सर्वांसाठी ठेवला आहे, जो नीतिमान न्यायाधीश येशू मला देतील आणि
फक्त मलाच नव्हे तर, अशा प्रत्येकाला जे येशूंच्या प्रगट होण्याविषयीची आवड बाळगतात त्या सर्वांना, त्या दिवशी
देतील.
9 माझ्याकडे लवकर ये. 10 वर्तमान जगाकडे आकर्षिला जाऊन देमास मला सो◌ेडून, थेस्सलनीकाला निघून गेला
आहे. क्रेस्केस गलतीयास आणि तीत दालमतियास गेला आहे. 11 मात्र लूकच माझ्याजवळ आहे. मार्काला
आपल्याबरोबर घेऊन ये, कारण सेवेच्या कार्यात तो माझ्याकरता मदतगार (उपयोगी) आहे. 12 तुखिकाला मी इफिसास
पाठवलेले आहे. 13 त्रोवसांत, कार्पाच्या घरी, माझा झगा, पुस्तकें आणि नोट्स(लेख) विशेषकरून ''पार्चमेंट" राहून गेले
होते, येताना ते सर्व घेऊन ये.
14 आलेक्सांद्र तांबटाने माझी बहुत हानि केली होती, त्याची कृत्यें मी परमेश्वराच्या हाती सोपून दिली आहेत. 15 तू
देखील त्याच्यापासून सांभाळून रहा, स्वतःला जप, कारण त्याने आमच्या वचनांचा कडकडून विरोध केला होता.
16 माझ्या पेशी समयी, कोणीही माझ्या बाजूला (बरोबर) नव्हता, सर्वांनी मला एकटे सोडले होते. मी प्रार्थना करतो की
परमेश्वराने त्या सर्वांना क्षमा करावी. 17 तरीपण येशू माझ्या बाजूला होते आणि त्यांनी मला बल प्रदान केले, यासाठी की
माझ्याकडून पूर्णपूर्ण येशूवार्ता पसरावी आणि सर्व गैरयहूदी लोकांपर्यंत संदेश पोहंचावा. मी राजाच्या जबडयातून बाहेर
ओढला गेलो होतो. 18 येशू मला प्रत्येक वाईट प्रसंगापासून सोडवून आपल्या स्वर्गीक राज्यासाठी सुरक्षित राखून
ठेवतील.
19 युगानुयुग त्यांना गौरव मिळो. होय, असेच होवो. अनेसिफराचे घराणे, प्रिस्का आणि अक्विला यांना सलाम.
20 एरास्त करिंथातच राहिला होता, परंतु त्रफिमाला आजारी दशेत मी मिलेतात ठेवले आहे. 21 हिवाळयाचा आरंभ
होण्यापूर्वी येण्याचा प्रयत्न कर. येथे यूबूल, पुदेस, लीन व क्लौदिया आणि दुसरे सर्व विश्वासीं सलाम सांगतात.
22 प्रभू येशू तुझ्या आत्म्याबरोबर असोत आणि परमेश्वराची असीम कृपाही. होय असेच व्हावे.